**महाराष्ट्र शासन**
**कृषि विभाग**
**नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प**
**३० अर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई ४०० ००५**

दूरध्वनी क्र. ०२२-२२१६३३५१/५२ ई-मेल : pmu@mahapocra.gov.in

NDKSP-२२०१९(२१)/१६/२०२५-DBT दि. २८/ १० /२०२५

प्रति,

१. विभागीय कृषि सहसंचालक (प्रकल्पांतर्गत सर्व)
२. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (प्रकल्पांतर्गत सर्व)

विषय : नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक लाभाच्या घटकांच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित करणे बाबत ..

संदर्भ :- १. शासन निर्णय क्र.नादेकृ ४६२२/प्र.क्र.९४/८-अे, दि. १४/१०/२०२४.
२. शासन निर्णय क्र.कृवपदुम-१९०४६/३६/२०२५-MAG-8A (E-११६८०५०), दि. ०८/०७/२०२५.

उपरोक्त विषयान्वये महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागांतर्गत, जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यासाठी दिनांक १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील एकूण २१ जिल्ह्यांमधील ७,२०१ गावे निवडण्यात आली आहेत. तसेच नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, टप्पा-२ च्या अंमलबजावणीस व जागतिक बँकेसोबत करारनामा करण्यास दिनांक ०८ जुलै २०२५ च्या शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात आली आहे. प्रकल्पाचा प्रमुख उद्देश शेतकऱ्यांना बदलत्या हवामानाशी जुळवून घेण्यासाठी सक्षम करणे व कृषी आधारित उपजीविकेची साधने उपलब्ध करून शेती किफायतशीर करणे हा आहे. बदलत्या हवामानाचा शेतीला कमीत कमी फटका बसेल यासाठी गावनिहाय नियोजन करण्यात येत असून प्रकल्पांतर्गत वैयक्तिक शेतकऱ्यांना हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचा अवलंब करणेसाठी विविध घटक राबविण्यात येणार आहेत. त्याअनुषंगाने सोबत जोडलेल्या **परिशिष्ट अ** मध्ये नमूद केलेले घटकांच्या अंमलबजावणीसाठीच्या मार्गदर्शक सूचना या पत्रासोबत सहपत्रीत करण्यात येत आहेत.त्यानुसार प्रकल्पांतर्गत गावांमध्ये सदर घटकांची अंमलबजावणी करण्यात यावी. तसेच उर्वरित वैयक्तिक लाभाच्या घटकांच्या मार्गदर्शक सूचना यथावकाश निर्गमित करण्यात येतील.

सोबत : घटकनिहाय मार्गदर्शक सूचना

(परिमल सिंह)
प्रकल्प संचालक
नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प,मुंबई

प्रत- १. मा. अपर मुख्य सचिव (कृषि), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
२. आयुक्त कृषि, महाराष्ट्र राज्य, पुणे.

# शेततळे अस्तरीकरण

**प्रस्तावना:**

हवामान बदलामुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास शेतक-यांना सक्षम करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाचा जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प सुरु करण्यात आलेला आहे. राज्यातील पर्जन्यावर आधारित कोरडवाहू शेतीची पाणलोट व जलसंधारणाच्या माध्यमातून उत्पादकता वाढविण्यासाठी विविध योजनामधून अनुदानावर शेततळे योजना राबविण्यात येत आहेत.

राज्यातील बहुतांश कोरडवाहू शेती ही पावसावर अवलंबून असून, मराठवाडा, विदर्भ व पूर्व विदर्भ या भागांमध्ये पावसाचे प्रमाण कमी, वितरण असमान आणि खंड वारंवार जाणवतो. यामुळे सिंचनाच्या अभावामुळे पीक उत्पादनात मोठी घट येते, तर काही वेळा पीक पूर्णतः नष्ट होऊन शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होते. दुसरीकडे, ज्या वेळी पाऊस जास्त प्रमाणात पडतो, तेव्हा अपधाव पाणी ओढे-नाल्यांतून वाहून जातो व वाया जातो. या समस्येवर शाश्वत उपाय म्हणून शेततळ्यांच्या माध्यमातून पावसाच्या अपधाव पाण्याची साठवणूक करणे आणि संरक्षित सिंचनासाठी त्याचा उपयोग करणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. परंतु साठवलेले पाणी जास्त काळ टिकवण्यासाठी व पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी शेततळ्यांचे अस्तरीकरण (Lining) करणे आवश्यक आहे. शेततळे अस्तरीकरणामुळे पाण्याची गळती थांबवता येते, पाणी टिकवून ठेवता येते आणि शेतकऱ्यांना गरजेनुसार शेतीसाठी वापरता येते. त्यामुळे उत्पादनक्षमता वाढते, आर्थिक नुकसान टळते आणि शेती अधिक शाश्वत बनते. त्यामुळे शेततळे अस्तरीकरण हा घटक प्रकल्पा अंतर्गत राबविण्यात येत आहे.

**उद्दिष्टे:**

१. प्रकल्पांतर्गत निवडलेल्या गावामधील अल्प व अत्यल्प भूधारक शेतक-यांना हवामान बदलामुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास सक्षम बनविणे.
२. संरक्षित सिंचनाची सुविधा निर्माण करणे, दुबार पिकाखालील क्षेत्र वाढविणे व शेतकऱ्याच्या उत्पन्नात वाढ करणे.
३. शेततळ्याच्या माध्यमातून फळे व भाजीपाला पिके, मत्स्योत्पादन, बागायत, आणि पशुपालन यांसारख्या पूरक शेती उपक्रमांना प्रोत्साहन देणे

**लाभार्थी निवडीचे निकष :**

१. प्रकल्पांतर्गत शेततळे अस्तरीकरण या घटकासाठी ५ हेक्टर पर्यन्त जमीन धारणा असलेल्या शेतकऱ्यांमधून अनुक्रमे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, महिला, दिव्यांग व सर्वसाधारण या प्राधान्यक्रमानुसार लाभार्थी निवड करण्यात येईल.
२. लाभार्थ्याच्या मालकीच्या जमिनीत कोणत्याही शासकीय योजनेंतर्गत अथवा स्वतः खोदकाम करण्यात आलेले इनलेट आउटलेट विरहित शेततळे अस्तित्वात असणे अनिवार्य आहे.
३. सदर शेततळ्याचे आकारमान **किमान १५X१५X३ मीटर (घनफळ ४४१ घ. मी.)** आवश्यक आहे.
४. लाभार्थ्याने यापूर्वी कोणत्याही शासकीय योजनेतून अस्तरीकरण या घटकसाठी अनुदान घेतलेले नसावे.

**अर्थसहाय्य:**

१. इनलेट आउटलेट विरहित शेततळ्यांच्या प्लास्टिक फिल्म अस्तरीकरणासाठी प्रत्यक्ष मोजमापानुसार लागणाऱ्या खर्चाच्या ५०% किंवा ₹७५,००० पैकी जे कमी असेल ते अर्थसहाय्य देय आहे.
२. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील लाभार्थी यांना प्रत्यक्ष मोजमापानुसार लागणाऱ्या खर्चाच्या ९० % किंवा ₹७५,००० पैकी जे कमी असेल ते अर्थसहाय्य देय राहील.

३. प्रकल्पा अंतर्गत शेततळे अस्तरीकरणासाठी प्लास्टिक शीट ५०० मायक्रॉन रु. ७७ प्रती चौरस मीटर व शीट बसविण्यासाठी रु. १८ प्रती चौरस मीटर याप्रमाणे निश्चित करण्यात आलेले दर अनुज्ञेय राहतील.

| शेततळ्याचे आकारमान | एकूण क्षेत्रफळ (घ.मी.) | अस्तरीकरणासाठी लागणारी फिल्म (चौ.मी.) | अस्तरीकरणासाठी येणारा खर्च | | | देय अनुदान रक्कम रु. | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | फिल्मची किंमत (रु. ७७/- प्रती चौ. मी.) | अस्तरीकरणा-साठी खर्च (रु.१८/- प्रती चौ.मी.) | एकूण रक्कम (रु. ९५/-प्रती चौ.मी.) | ५० % | ९० % SC/ST प्रवर्ग |
| **१५X१५X३ मी.** | ४४१ | ५९५ | ४५८३६ | १०७१५ | ५६५५१ | २८२७६ | ५०८९६ |
| **२०X१५X३ मी.** | ६२१ | ६६५ | ५१२२२ | ११९७४ | ६३१९६ | ३१५९८ | ५६८७६ |
| **२०X२०X३ मी.** | ८७६ | ८६८ | ६६८१७ | १५६२० | ८२४३६ | ४१२१८ | ७४१९३ |
| **२५X२०X३ मी.** | ११३१ | १०४६ | ८०५१९ | १८८२३ | ९९३४२ | ४९६७१ | ८९४०७ |
| **२५X२५X३ मी.** | १४६१ | १२३६ | ९५१५५ | २२२४४ | ११७३९९ | ५८७०० | १०५६५९ |
| **३०X२५X३ मी.** | १७९१ | १४२६ | १०९७९१ | २५६६५ | १३५४५७ | ६७७२९ | १२१९११ |
| **३०X३०X३ मी.** | २१९६ | १६४३ | १२६५४५ | २९५८२ | १५६१२७ | ७५००० | १४०५१४ |

४. अस्तरीकरणासाठी वापरावयाच्या प्लास्टिक फिल्मचे तांत्रिक निकष **परिशिष्ट-अ** मध्ये दिले आहेत.

**अंमलबजावणीची कार्यपद्धती : अंमलबजावणीतील विविध स्तरावरील जबाबदाऱ्या**

**लाभार्थी**

१. इच्छुक शेतकऱ्यांनी नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या https://dbt.mahapocra.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करून अर्ज सादर करावा. तसेच आवश्यक कागदपत्रे संकेतस्थळावर अपलोड करावीत.
२. अर्ज सादर करतेवेळी शेतकऱ्याने हमीपत्र (**परिशिष्ट २**) ऑनलाइन सादर करावे.
३. पूर्वसंमती प्राप्त झाल्यानंतर मार्गदर्शक सुचनेप्रमाणे दिलेल्या तांत्रिक निकषानुसार काम पूर्ण करणे बंधनकारक राहील. सदर कामासाठी कोणतीही आगाऊ रक्कम (अग्रीम) मिळणार नाही.
४. पुर्वसंमती मिळालेपासून **१५ दिवसाच्या आत काम सुरु करणे** व **२ महिन्यात** काम पुर्ण करणे आवश्यक राहील. अन्यथा पुर्वसंमती रद्द करण्यात येईल.
५. शेतक-यांना त्यांच्या पसंतीनुसार अस्तरीकरणासाठी नोंदणीकृत उत्पादक व वितरक निवडण्याचा अधिकार राहील.
६. शेततळ्यासाठी BIS Standard ५०० मायक्रॉन रीइनफोर्सड् एचडीपीई जीओ मेंबरेन IS **१५३५१:२०१५** Type II या दर्जाची फिल्म वापरणे बंधनकारक राहील.
७. शेततळ्यामध्ये जंगली/मोकाट जनावरे जाऊन शेततळ्याचे व प्लास्टिकचे नुकसान होऊ नये यासाठी शेततळ्याभोवती शेतकऱ्याने **स्वखर्चाने** कुंपण बंधनकारक राहील.
८. शेततळे अस्तरीकरण आणि कुंपन करणे इ. कामे झाल्यानंतर शेतकऱ्याने अनुदान मागणी देयके, प्लास्टीक फिल्म नमुना तपासणी अहवालाची प्रमाणित प्रत व आवश्यक कागदपत्रे स्वसाक्षांकित करून अपलोड करावीत.

**ग्राम कृषि विकास समिती (GKVS)**

१. गावातील इच्छुक शेतकऱ्यांना या घटकांतर्गत बाबींचा लाभ घेण्यासाठीचे अर्ज करणे जनजागृती करतील.

२. ऑनलाईन प्राप्त अर्ज व अपलोड केलेली कागदपत्रे समूह सहाय्यक यांचे मदतीने छाननी करून अर्जाची अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, महिला, दिव्यांग शेतकरी व सर्वसाधारण या प्राधान्यक्रमानुसार लाभार्थी निवड करतील.
३. इच्छुक लाभार्थी यांचे प्राप्त अर्जांच्या पात्र/अपात्रते बाबत निर्णय घेऊन अपात्र अर्जदारांना अपात्रतेबाबत कारणांसह अवगत करतील.
४. अंमलबजावणी करण्यात आलेल्या बाबींचे सामाजिक लेखापरीक्षण करणे .

**समूह सहाय्यक**

१. समुह सहाय्यक हे इच्छिूक लाभार्थी शेतकऱ्यांचे प्रकल्पाच्या https://dbt.mahapocra.gov.in पोर्टल वर अर्ज करून घेतील.
२. शेतकऱ्यांनी ऑनलाईन अर्ज केल्यानंतर शेतकऱ्याने अपलोड केलेल्या कागदपत्रांची छानणी करतील.
३. सर्व ऑनलाईन प्राप्त अर्ज ग्राम कृषि विकास समितीसमोर मान्यतेसाठी सादर करतील व व समितीच्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही करतील.
४. शेतकऱ्यांस योजनेच्या अटी व शर्ती तसेच घटकाबाबतचे आर्थिक व तांत्रिक निकष समजावून सांगावे.
५. पात्र लाभार्थ्यांना पूर्वसंमती बाबत अवगत करणे.

**सहाय्यक कृषि अधिकारी**

१. अर्जदाराने अपलोड केलेले ऑनलाईन अर्ज, ग्राम कृषि विकास समिती सभेचे इतिवृत्त, इत्यादी बाबींची छाननी करणे.
२. लाभार्थी शेतकऱ्याने सदर घटकाचा यापूर्वी इतर शासकीय योजनेतून लाभ घेतलेला आहे काय?, याची पडताळणी करणे.
३. पात्र अर्जांच्या प्रस्तावित प्रकल्प स्थळाची शेतकऱ्याच्या अर्जांमध्ये नमूद सर्वे नं. मध्ये प्रत्यक्ष स्थळ पाहणी **परिशिष्ट -३** नुसार ऑनलाइन DBT मोबईल ॲप द्वारे करावी, आणि प्रस्तावित जागा निकषानुसार व तांत्रिकदृष्ट्या योग्य असल्याची खात्री करावी.
४. नियोजित प्रकल्प स्थळाचा भौगोलिक स्थानांकित फोटो, आणि तपासणी बाबतचा तपशील प्रकल्पाच्या DBT App मध्ये नमूद करावा.
५. छाननी अंती पात्र प्रस्ताव मंजुरीस्तव पुढील डेस्क वर पाठवतील तसेच काही त्रुटी आढळून आल्यास प्रस्ताव त्रुटी नमूद करून त्रुटी पूर्ततेसाठी परत (Sent Back) पाठवतील.
६. शेतक-यांना योजनेच्या अटी व शर्ती तसेच तांत्रिक निकष व आराखडा समजून सांगणे.
७. कामाच्या विविध टप्प्यावर भेट देऊन लाभार्थीस तांत्रिक मार्गदर्शन करणे.

**उप कृषि अधिकारी**

१. कार्यक्षेत्रामध्ये लाभार्थी निवड व अनुदान अदायगी यासह सर्व कार्यवाही मार्गदर्शक सूचनेनुसार होत असलेबाबत वेळोवेळी पडताळणी करणे.
२. काम सुरू असताना प्रकल्प स्थळास भेट देऊन तांत्रिक मार्गदर्शन करणे व तांत्रिक निकषाप्रमाणे काम होत असल्याची खात्री करणे
३. कार्यक्षेत्रामध्ये सदर घटकांच्या अंमलबजावणी बाबत वेळोवेळी आढावा घेणे.

**मंडळ कृषि अधिकारी**

१. लाभार्थी शेतकऱ्याने काम पूर्ण झाल्यानंतर देयके डीबीटी प्रणालीद्वारे अपलोड केल्यानंतर मंडळ कृषि अधिकारी यांनी शेतकऱ्याचा ऑनलाईन अर्ज, पूर्वसंमती पत्र, अपलोड केलेली देयके, नमुना तपासणी अहवालाची प्रमाणित प्रत, इत्यादी कागदपत्रांची छाननी करावी.

२. शेतक-यांनी प्लॅस्टीक फिल्म बसविल्यानंतर तसेच तारेचे कुंपण केल्यावर मंडळ कृषि अधिकारी यांनी कांमाची मापे घेऊन मापनपुस्तिकेमध्ये नोंदवावीत आणि मोका तपासणी करावी.
३. नोंदणीकृत उत्पादक व वितरक यांच्याकडूनच अस्तरीकरण काम केल्याचे खात्री करण्यात यावी.
४. शेततळे अस्तरीकरणाचे काम मार्गदर्शक सूचनेप्रमाणे तांत्रिक निकषानुसार योग्य असल्याबाबत मोका तपासणी करावी व इतर सर्व बाबींची डीबीटी ॲपवर नोंद घ्यावी.
५. मोका तपासणी करून सोबत दिलेल्या प्रमाणे मोका तपासणी अहवाल (**परिशिष्ट - ५**), मापन पुस्तिका, प्रमाणित केलेली देयके, पूर्ण झालेल्या कामाचा शेतकऱ्यासमवेत फोटो व इतर आवश्यक कागदपत्रे प्रकल्पाच्या DBT App द्वारे अपलोड करावीत.
६. मार्गदर्शक सुचने प्रमाणे अनुदान परिगनणा करून पात्र प्रस्ताव मंजुरीस्तव पुढील डेस्क वर पाठवतील तसेच काही त्रुटी आढळून आल्यास प्रस्ताव त्रुटी नमूद करून त्रुटी पूर्ततेसाठी परत (Sent Back) पाठवतील.
७. कार्यक्षेत्रामध्ये लाभार्थी निवड व अनुदान अदायगी यासह सर्व कार्यवाही मार्गदर्शक सूचनेनुसार होत असलेबाबत वेळोवेळी पडताळणी करणे.
८. कामाच्या विविध टप्प्यावर भेट देऊन लाभार्थ्यास तांत्रिक मार्गदर्शन करणे.
९. कार्यक्षेत्रामध्ये सदर घटकांच्या अंमलबजावणी बाबत वेळोवेळी आढावा घेणे.

### तालुका कृषि अधिकारी

१. सहाय्यक कृषि अधिकारी यांचेकडुन पूर्वसंमती करिता शिफारस झालेल्या प्रस्तावांतील कागदपत्रांची व अर्जाची छाननी करावी.
२. लाभार्थी शेतकऱ्याने सदर घटकाचा यापूर्वी इतर शासकीय योजनेतून लाभ घेतलेला आहे काय?, याची पडताळणी करण्यात यावी.
३. सदरचा लाभार्थी पूर्वसंमतीस पात्र असल्याबाबत तालुका कृषि अधिकाऱ्यांची खात्री पटल्यानंतर त्यांना शेततळे अस्तरीकरणास ऑनलाईन पूर्वसंमती देण्यात यावी.
४. शेतक-यांना अधिकृत फिल्म पुरवठादारांची यादी उपलब्ध करुन द्यावी.
५. ज्या शेतक-याचे अर्ज / कागदपत्रांची पुर्तता झाली नसेल, यास्तव पुर्ततेअभावी पुर्वसंमती देता येणार नसेल असे प्रस्ताव सहायक कृषि अधिकारी यांना पुन्हा त्रुटी पूर्ततेसाठी परत (Sent Back) पाठवतील
६. मार्गदर्शक सूचनेनुसार लाभार्थी पात्र नसल्यास तालुका कृषि अधिकारी अर्ज रद्द (Reject) करतील.
७. कार्यक्षेत्रामध्ये लाभार्थी निवड व अनुदान अदायगी यासह सर्व कार्यवाही मार्गदर्शक सूचनेनुसार होत असलेबाबत वेळोवेळी पडताळणी करणे.
८. कार्यक्षेत्रामध्ये सदर घटकांच्या अंमलबजावणी बाबत वेळोवेळी आढावा घेणे.
९. मार्गदर्शक सुचनेत नेमून दिल्याप्रमाणे पर्यवेक्षकीय तपासणी करणे.

### लेखाधिकारी उपविभाग स्तर :

१. मंडळ कृषि अधिकारी यांनी शिफारस केलेल्या प्रस्तावाची लेखा अधिकारी उपविभाग स्तर हे मुख्यतः खालील बाबींची छाननी करतील. शेतक-याने अपलोड केलेले देयके, मंडळ कृषि अधिकारी स्तरावरून अपलोड केलेले मोका तपासणी अहवाल, मापन पुस्तिका, स्थळ पाहणी फोटो, काम पूर्णत्वाचा फोटो, साक्षांकित देयके, व इतर अनुषंगिक कागदपत्रे.
२. मंडळ कृषि अधिकारी यांनी शिफारस केलेली रक्कम मार्गदर्शक सुचनेनुसार असल्याची खात्री करतील.
३. प्राप्त प्रस्ताव तपासणी अंती मार्गदर्शक सूचनेनुसार परिपूर्ण असल्यास उप विभागीय कृषि अधिकारी यांचेकडे अनुदान अदायगीसाठी शिफारस करावी.
४. प्रस्तावाच्या छाननी दरम्यान त्रुटी आढळून आल्यास शेरा नमूद करून संबंधीत मंडळ कृषि अधिकारी यांचे कडे त्रुटी पूर्ततेसाठी परत (Back To Stage ) पाठवतील.

**उपविभागीय कृषि अधिकारी :**

१. लेखाधिकारी स्तरावरुन शिफारस झालेले प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर देयक व मोका तपासणी अहवालाची छाननी उपविभागीय कृषि अधिकारी स्तरावर करण्यात येईल व लेखाधिकारी यांनी शिफारशीत केलेल्या अनुदानाच्या रकमेस अंतिम मान्यता देतील.
२. शेततळे अस्तरीकरणाचे काम पूर्ण झाल्यानंतर मंडळ कृषि अधिकारी यांनी प्रत्यक्ष घेतलेल्या नोंदी व मोका तपासणी अहवाल व इतर आनुषंगिक कागदपत्रे याची पडताळणी करण्यात यावी.
३. प्रस्तावाच्या छानणी दरम्यान त्रुटी आढळून आल्यास त्रुटी नमूद करून मागील डेस्क वर सदर प्रकरण त्रुटी पूर्ततेसाठी परत (Back To Stage ) पाठवतील.
४. उपविभाग स्तरावर लाभार्थी निवड व अनुदान अदायगी यासह सर्व कार्यवाही मार्गदर्शक सूचनेनुसार होत असलेबाबत वेळोवेळी पडताळणी करावी.
५. मार्गदर्शक सुचनेत नेमून दिल्याप्रमाणे पर्यवेक्षकीय तपासणी करणे.

**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी:-**

१. जिल्ह्यामध्ये उपविभाग स्तरावर लाभार्थी निवड व अनुदान अदायगी यासह सर्व कार्यवाही मार्गदर्शक सूचनेनुसार होत असलेबाबत वेळोवेळी पडताळणी करावी.
२. उपविभाग स्तरावर झालेल्या कामांची आकस्मिक तपासणी करावी व विहित नमुन्यात पर्यवेक्षकीय तपासणी अहवाल सादर करावा.

**विभागीय कृषि सहसंचालक:**

१. विभागामध्ये लाभार्थी निवड व अनुदान अदायगी यासह सर्व कार्यवाही मार्गदर्शक सूचनेनुसार होत असलेबाबत वेळोवेळी पडताळणी करणे.
२. मार्गदर्शक सुचनेत नेमून दिल्याप्रमाणे पर्यवेक्षकीय तपासणी करणे.

**तांत्रिक व सर्वसाधारण सुचना :-**

१. लाभार्थ्याने शेततळे अस्तरीकरणासाठी अधिकृत ५०० मायक्रॉनची प्लास्टीक फिल्म वापरणे बंधनकारक राहील.
२. शेततळे अस्तरीकरणासाठी आवश्यक असलेल्या BIS standard **रीइन्फोर्स्ड** HDPE **जिओमेंब्रेन** (IS **१५३५१:२०१५** TYPE II) दर्जाच्या फिल्मचे नोंदणीकृत प्लास्टिक फिल्म उत्पादक व त्यांचे नोंदणीकृत विक्रेते यांची अद्ययावत यादी **ताकृअ, उविकृअ आणि जिअकृअ कार्यालयात ठेवण्यात यावी.**
३. शेतक-यांना त्यांच्या पसंतीनुसार अस्तरीकरणासाठी नोंदणीकृत उत्पादकांमधून अधिकृत दर्जाच्या प्लास्टीक फिल्म उत्पादक निवडण्याचा अधिकार राहील.
४. शेतक-यांनी प्लास्टीक फिल्म ही नमुना तपासणी अहवालाच्या प्रमाणित (Pass) प्रतिसह खरेदी करावी व फिल्मचे बील जीएसटीसह घ्यावे.
५. मंजूर आकारमानापेक्षा मोठ्या शेततळ्यास शेतक-याने अस्तरीकरण केल्यास अधिकचा खर्च शेतक-याने स्वतः करावयाचा आहे.
६. प्लास्टीक फिल्मचा पुरवठा दर रुपये ७७ प्रति चौ.मी. आणि फिल्म बसवण्यासाठी रु. १८ प्रति चौ.मी. असा एकूण रु. ९५ प्रति चौ.मी. निश्चित करण्यात आलेला आहे.
७. फिल्म शेततळयाच्या काठापासुन बंद (अँकरींग) करून संपूर्ण शेततळयात अशा प्रकारे बसवावी की ज्यामुळे फिल्म पाण्याच्या वजनामुळे खाली घसरणार नाही व शेततळयातील साठलेले पाणी जमिनीमध्ये मुरणार नाही.

८. फिल्म अस्तरीकरणा करीता लाभार्थ्याने शेततळयाच्या आतील बाजूने योग्य रितीने फिनिशिंग /ड्रेसिंग करावी.
९. शेततळयांचे प्लास्टीक फिल्मची देखभाल / संरक्षण शेतकरी यांचेमार्फत केली जाईल. प्लॅस्टीक फिल्मबाबत गुणवत्ता व दर्जाबाबत हमी देण्याची जबाबदारी उत्पादक/पुरवठादार यांची राहील. गुणवत्ते संदर्भात प्रश्न/वाद निर्माण झाल्यास शेतक-यांनी ग्राहक कायद्यानुसार कार्यवाही करावी.
१०. शेततळे अस्तरीकरणाची संपूर्ण माहिती असलेला ३ X २ फुट आकाराचा बोर्ड शेततळ्याजवळ दिसेल अशा प्रकारे लावून घ्यावा. त्यावर "नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या अर्थसहाय्याने" असे नमूद करुन शेतकऱ्याचे नाव, गाव, सर्वे नं., शेततळ्याचे आकारमान, वर्ष, एकुण खर्च रक्कम, अर्थसहाय्याची रक्कम इत्यादी तपशील नमूद करावा. सदरील खर्च लाभार्थीने स्वतः करावयाचा आहे.
११. नैसर्गिक आपत्तीमुळे शेततळे अस्तरीकरणास कोणत्याही प्रकारची हानी पोहोचल्यास नुकसान भरपाई अनुज्ञेय राहणार नाही

**क्षेत्रीय तपासणी:-**

वैयक्तिक शेततळे या घटकाच्या प्रभावी अंमलबजावणी करिता सनियंत्रण अधिकाऱ्यांनी खालील नेमून दिलेल्या प्रमाणपत्रात तपासणी करावी व तपासणी अहवाल सादर करावा.

| सनियंत्रण अधिकारी | तपासणी टक्केवारी |
|---|---|
| विभागीय कृषि सहसंचालक | ५ कामे प्रति वर्ष |
| नोडल अधिकारी, वि.कृ.स.सं .कार्यालय | ५ कामे प्रति वर्ष |
| जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | २ टक्के |
| नोडल अधिकारी, जि.अ.कृ.अ .कार्यालय | २ टक्के |
| उपविभागीय कृषि अधिकारी | ५ % |
| तालुका कृषि अधिकारी | १०% |
| मंडळ कृषि अधिकारी | १०० % |

परिशिष्ट-अ

# रिइनफोर्स्ड एचडीपीई जिओमेंबरेन ५०० मायक्रॉन फिल्मसाठी आवश्यक गुणधर्म

**(IS: 15351:2015 TYPE II)**

| Sr. No. | Property | Requirement | |
|---|---|---|---|
| | | TYPE II | Method of Test |
| 1 | Thickness (mm), Min. | 0.50 mm | IS:7016 Part 1 |
| 2 | Mass (g/m$^2$), Min. | 420 g/m$^2$ | IS:7016 Part 1 |
| 3 | Dimensions (Length & Width) | As declared + 1 percent with no Negative Tolerance | Annex A Of IS 11652 |
| 4 | Carbon black content, Percent, Min. | 2.5 ±0.5 | Annex A Of IS 11652 |
| 5 | Breaking load on 20 cm x 10 cm strip, N, Min before U.V. exposure | (D1) 6600N | IS 13162 (Part 5) |
| | | (D1) 6600N | |
| 6 | Strain At Maximum Load, Percent | 20 ± 5% | IS 13162 (Part 5) |
| 7 | Breaking load on 20 cm x 10 cm strip, N, Min after U.V. exposure of 1000H | 80% of actual original value | IS 13162 (Part 2 & 5) |
| 8 | Impact failure load, at 1520mm drop, Min gram force at 50 percent failure | 1840GF | Annex B |
| 9 | Tear resistance, N, Min. | 250N | IS 7016 (Part 3) |
| 10 | Puncture resistance, N, Min | 500N | Annex D |
| 11 | Bursting strength (Ball burst), (N/cm$^2$), Min | 110 (N/cm$^2$) | IS 7016 (Part 6) |
| 12 | Seam strength before UV exposure (N/mm), Min | 30 (N/mm) | IS 15060 |
| 13 | Seam strength after Uv exposure (N/mm), min | 80% of actual original value | Annex B & IS:15060 |
| 14 | Hydrostatic resistance before UV exposure | No leakage at 15kg/cm$^2$ | Annex E |
| 15 | Hydrostatic resistance after UV exposure of 1000 hours | 80% of actual original value | Annex E |
| 16 | Ash content % Max | 1% | Annex F |
| **NOTE:** For hydrostatic resistance test, the test specimen shall be selected such that at least one joint covered, if provided. | | | |

## परिशिष्ट - १

## अर्ज छाननी विविध स्तर

| अनु क्र. | कार्यवाही प्रक्रिया | स्तर | कालमर्यादा |
|---|---|---|---|
| १. | लाभार्थी शेतकऱ्याने अर्ज करणे व आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे | लाभार्थी | - |
| २. | लाभार्थी शेतकऱ्याने अपलोड केलेली कागदपत्रे व माहिती यांची पडताळणी करणे | समूह सहायक | १० दिवस |
| ३. | ग्राम कृषि विकास समितीची मान्यता घेणे | समूह सहायक ग्राम कृषि / विकास समिती | १० दिवस |
| ४. | लाभार्थी शेतकऱ्याने अपलोड केलेली कागदपत्रे व माहिती तसेच ग्राम कृषि विकास समितीची मान्यता यांची पडताळणी करणे | सहायक कृषि अधिकारी | १० दिवस |
| ५. | पूर्वसंमती देणे | तालुका कृषि अधिकारी | १० दिवस |
| ६. | अनुदान मागणी करणे | लाभार्थी शेतकरी | ६० दिवस |
| ७. | मोका तपासणी करणे | मंडळ कृषि अधिकारी | १० दिवस |
| ८. | लाभार्थी शेतकऱ्याने अपलोड केलेली देयके, मोका तपासणी अहवाल, व इतर अनुषंगिक कागदपत्रे तपासणे व अनुदान शिफारस करणे | लेखाधिकारी (उप विभागीय कृषि अधिकारी कार्यालय) | १० दिवस |
| ९. | अंतीम अनुदान मंजुरी देणे. | उप विभागीय कृषि अधिकारी | १० दिवस |
| १०. | अनुदान वितरण करणे . | प्रकल्प व्यवस्थापन कक्ष | - |

# परिशिष्ट - २

# हमीपत्र

## नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प — शेततळे अस्तरीकरण

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत **"शेततळे अस्तरीकरण"** या घटकाकरिता ऑनलाईन अर्ज करीत आहे. त्यासाठीच्या निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सुचनांनूसार विहित अटी व शर्ती मला मान्य असून त्यासाठीचे हमीपत्र सादर करीत आहे.

**मी सत्यप्रतिज्ञेवर प्रमाणित करतो/ करते की,**

१. शेततळे अस्तरीकरण या घटकाच्या लाभाकरिता मार्गदर्शक सूचनांनुसार आवश्यक कागदपत्रे मी प्रकल्पाच्या डीबीटी पोर्टलवर अपलोड करण्यास बांधील आहे.
२. सदर शेततळे अस्तरीकरणासाठी इतर कोणत्याही शासकीय योजने अंतर्गत यापूर्वी अनुदान घेतले नाही अथवा यापुढे घेण्यात येणार नाही, याची मी हमी देतो.
३. शेततळे अस्तरीकरणासाठी BIS Standard मधील ५०० मायक्रॉन रीइनफोर्सड् एचडीपीई जीओ मेंबरेन IS १५३५१:२०१५ Type II या दर्जाची प्लास्टीक फिल्म वापरणे बंधनकारक असल्याची मला जाणीव आहे.
४. शेततळे अस्तरीकरणासाठी लागणारी फिल्म नोंदणीकृत उत्पादक व वितरक यांचेकडून खरेदी करणे बंधनकारक आहे याची मला जाणीव आहे.
५. मी या शेततळयामध्ये साठलेल्या पाण्याचा उपयोग सूक्ष्म सिंचनासाठी करेल.
६. मी वरील शेततळयामध्ये विहीर, नदी, कालव्यातून उपसा सिंचन करुन पाणी साठवणार आहे.
७. मी सदरचे शेततळे अस्तरीकरणासाठीच्या सर्व तांत्रिक बाबीची माहिती घेतलेली आहे व ती मला मान्य आहे.
८. मार्गदर्शक सुचनांनुसार अस्तरीकरणाचे काम पूर्ण झाल्यावर प्रकल्पाच्या डीबीटी पोर्टलवरून ऑनलाईन अनुदान मागणी करणे माझ्यावर बंधनकारक राहील.
९. अस्तरीकरणाचे काम पुर्ण झाल्यावर मोका तपासणी झाल्यानंतर मार्गदर्शक सुचने प्रमाणे देय असलेले अनुदान मला मिळणार आहे व यापेक्षा जादाचा होणारा खर्च मी स्वतः करण्यास बांधिल राहील, याची मला जाणिव आहे.
१०. अस्तरीकरण केलेल्या शेततळ्याचे संरक्षण, देखभाल, दुरुस्ती करण्याची पूर्ण जबाबदारी माझी राहील याची मला जाणीव आहे.
११. सदर शेततळ्यात पाणी साठवणे व साठवलेले पाणी शेतात पोहचविण्यासाठी लागणारा खर्च, मला स्वतःला करावयाचा आहे, यास कोणत्याही प्रकारचे अर्थसहाय्य मिळणार नाही; त्याच प्रमाणे शेततळ्याच्या देखभालीसाठी येणारा आवर्ती खर्च व संपूर्ण देखभाल मला करावी लागेल याची देखील मला जाणीव आहे.
१२. शेततळे अस्तरीकरणाचे काम विहीत मुदतीत पूर्ण करणेची जबाबदारी माझी असून अस्तरीकरण अर्धवट अवस्थेत राहिल्यास अनुदानास पात्र नसेल, याची मला जाणीव आहे.
१३. प्लास्टीक अस्तरीकरण केल्यानंतर स्वखर्चाने कुंपण करणे बंधनकारक आहे, याची मला जाणीव आहे.
१४. शेततळे पूर्ण झाल्यावर शेततळे योजनेचा ४X३ फूट आकाराचा बोर्ड लावणे मला बंधनकारक राहील.
१५. मी घोषित करतो / करते की सदर अर्जामध्ये नमूद केलेली सर्व माहिती माझ्या माहिती व विश्वासानुसार सत्य व अचूक आहे.

(टिप : सदरचे परिशिष्ट प्रकल्पाच्या DBT ॲपवर उपलब्ध करून दिलेले आहे. त्यामुळे सदरील परिशिष्ट अपलोड करण्यात येवू नये.)

## परिशिष्ट - ३

## स्थळ पाहणी अहवाल

## नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प — शेततळे अस्तरीकरण

श्री/श्रीमती -------------------------------------------- मौजे. ------------- ता.----------------- जि. ------------------ यांनी त्यांचे मालकीचे स.नं./गट नं. ----------- मधील एकूण क्षेत्र ------------- (हे.) पैकी ------------- (हे.) क्षेत्रावर नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत शेततळे अस्तरीकरण या घटकासाठी अर्ज केलेला आहे. दिनांक --------------- रोजी भेट देऊन प्रस्तावित प्रकल्प स्थळाची लाभार्थी समक्ष पाहणी केली असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ क्र. | बाब | तपशील |
|---|---|---|
| १. | सदर अर्ज ग्राम कृषि विकास समितीने (GKVS) बैठकीमध्ये मंजूर केल्याचा दिनांक | |
| २. | लाभार्थीने मागणी केलेल्या घटकाचा प्रकार | शेततळे अस्तरीकरण |
| ३. | शेततळे अस्तरीकरणासाठी प्रस्तावित स्थळाचा सर्वे नं./गट नं. | |
| ४. | लाभार्थीने अस्तरीकरणासाठी मागणी केलेल्या शेततळ्याचे आकारमान (मी.) | ........X .........X ........ |
| ५. | लाभार्थ्याने यापूर्वी अस्तरीकरण घटकाचा लाभ इतर शासकीय योजनेतून घेतलेला आहे काय ? | |
| ६. | सदर गटात शेततळे अस्तरीकरण अस्तित्वात आहे किंवा कसे ? | आहे/नाही |
| ७. | लाभार्थी शेतकऱ्याकडे पाण्याचा स्रोत उपलब्ध आहे काय? | होय /नाही |
| ८. | लाभार्थीने दाखविलेले शेततळे अस्तरीकरणासाठी तांत्रिक दृष्ट्या योग्य आहे काय? | होय /नाही |
| ९. | अभिप्राय | |

प्रस्तावित प्रकल्प स्थळाची लाभार्थी समक्ष पाहणी केली असता सदर घटकासाठी आवश्यक व तांत्रिक निकषानुसार योग्य व आवश्यक क्षेत्र लाभार्थ्याकडे उपलब्ध असून प्रकल्प राबविण्यासाठी लाभार्थी सक्षम व पात्र आहे. वरील सर्व बाबी विचारात घेऊन सदर लाभार्थ्यास पूर्वसंमती देणेस शिफारस करणेत येत आहे.

**स्वाक्षरी**

नाव : ______________________

**सहाय्यक कृषि अधिकारी**

**सजा** : ______________________

**ता.** :______________________

**जि.** :______________________

(टिप : सदरचे परिशिष्ट प्रकल्पाच्या DBT ॲपवर उपलब्ध करून दिलेले आहे. त्यामुळे सदरील परिशिष्ट अपलोड करण्यात येवू नये.)

**परिशिष्ट - ४**

**शेतक-याचा काम पूर्णत्वाचा अहवाल**

**नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प — शेततळे अस्तरीकरण**

मी श्री / श्रीमती ------------------------------------------- गांव ---------------------- तालुका ---------------------- जिल्हा.---------------------------- असे प्रमाणित करतो / करते की, तालुका कृषि अधिकारी यांच्या पूर्व संमतीपत्र क्र---------------------- दिनांक / /२० अन्वये मला अस्तित्वातील शेततळेसाठी मंजूर केलेल्या ---------X---------X--------- मीटर या आकारमानाचे अस्तरीकरणाचे काम तांत्रिक निकषानुसार मी दिनांक . ---------------------- अखेर १०० टक्के पूर्ण केले आहे.

कृपया, पूर्ण झालेल्या अस्तरीकरण कामाचे मोजमाप घेऊन त्याची नियमानुसार मापनपुस्तीकेत नोंद घेण्यात यावी. सदर अनुदान माझ्या आधार संलग्न बँक खात्यावर जमा करण्यात यावे, ही विनंती.

दिनांक ----------------------

अर्जदाराची सही / अंगठा
श्री/श्रीमती

# परिशिष्ट - ५

## मोका तपासणी अहवाल

## नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प — शेततळे अस्तरीकरण

| | |
|---|---|
| १. | तपासणी दिनांक : |
| २. | **तपासणी पथक प्रमुख:- श्री........................................................ मंकृअ................................................**<br>**सदस्य:- श्री.................................................... उप कृषि अधिकारी ................................** |
| ३. | **लाभार्थी नाव** श्री ......................................................... ................ गाव ...............................<br>ता ....................... जि...................... सर्व्हे नं................. वर्गवारी: (अ.जा./अ.ज./महिला/सर्वसाधारण) |
| ४. | **मोका तपासणी तपशील**<br>शेततळ्याची लांबी ........... मी. X रुंदी ......... मी. X उंची .......... मी. क्षेत्रफळ ..................... चौ.मी.<br>प्लास्टिक अस्तरीकरणाचे एकूण क्षेत्रफळ...................................... चौ.मी. |
| ५. | **शेततळे अस्तरीकरणासाठी वापरण्यात आलेल्या प्लास्टिक फिल्मची तपासणी**<br>BIS नोंदणीकृत सेवा पुरवठादाराचे नाव: -.........................................................................................<br>संपर्क व पत्ता:-................................................................................................................ |
| ६. | **वितरकाचे नाव:-** ............................................................ ..............................<br>**सदर वितरक नोंदणीकृत आहे काय**...................................................................<br>**नोंदणी क्रमांक:-** ............................. ............................. ............................. |
| ७. | शेततळ्यासाठी BIS Standard ५०० मायक्रॉन रोइनफोर्सड् एचडीपीई जीओ मेंबरेन फिल्म IS १५३५१:२०१५ Type II या दर्जाची आहे किंवा नाही? **होय/नाही** |
| ८. | रिइनफोर्सड् एचडीपीइ जिओमेंबरेन ५०० मायक्रॉन फिल्मसाठी आवश्यक गुणधर्म **(IS:१५३५१:२०१५ Type II) परिशिष्ट अ** प्रमाणे पास कॉपी बिलासोबत आहे किंवा नाही? **होय/नाही**<br>**(सदरची बाब शेतक-याने उत्पादकाकडून प्लास्टिक फिल्म सोबत प्राप्त केलेल्या नमुना तपासणी अहवालाच्या प्रमाणित प्रती वरून तपासावी.)** |
| ९. | फिल्म शेततळयाच्या काठापासुन बंद (अँकरीग) करून संपूर्ण शेततळयात अशा प्रकारे बसवलेली आहे किंवा नाही की ज्यामुळे फिल्म पाण्याच्या वजनामुळे खाली घसरणार नाही व शेततळयातील साठलेले पाणी जमिनीमध्ये मुरणार नाही. **होय/नाही** |
| १०. | तारेच्या जाळीचे कुंपण शेततळयाच्या बाहेरील बाजूस केलेले आहे किंवा नाही? **होयनाही/** |
| ११. | शेततळयांमध्ये पाणी भरलेले आहे किंवा नाही? **होयनाही/** |
| १२. | शेततळ्याच्या बाजूने गवत लागवड केली आहे नाही/ **होयनाही/** |
| १३. | वैयक्तिक शेततळे अस्तरीकरण योजनेची माहिती असलेला बोर्ड लावलेला आहे नाही/ **होयनाही/** |

**१४. मंजूर मॉडेल नुसार वैयक्तिक शेततळे अस्तरीकरणासाठी झालेल्या खर्चाचा तपशील**

| अ.क्र. | बाब | परिमाण | मा. सु. नुसार खर्चाचे मापदंड | प्रत्यक्ष खर्च | मा. सु. नुसार देय अनुदान |
|---|---|---|---|---|---|
| १. | प्लास्टिक फिल्म | ..................चौ.मी. | रु.मी.चौ/७७ . | | |
| २. | फिल्म लावण्याचा खर्च | ..................चौ.मी. | रु.मी.चौ/१८ . | | |
| | | | **एकूण** | | |

| | |
|---|---|
| १५. | शेततळे अस्तरीकरणाद्वारे साठविलेल्या पाण्याच्या कार्यक्षम वापरासाठी सरंक्षित सिंचनाची सोय शेतकऱ्याने केली आहे अथवा नाही? **होय/नाही** |
| १६. | **कामाची नोंद घेतलेली मापनपुस्तिकेचा तपशील**<br>गावाचे नाव................................ तालुका ........................ मा.पु.क्र ................... पृ.क्र................ |
| १७. | अंतिम देय अनुदान रक्कम रुपये ...................................... |

**दि.:- / /**

**स्थळ:-**

**स्वाक्षरी**

**पथक प्रमुख, श्री.................................. मकृअ..........**

**स्वाक्षरी**

**पथक सदस्य, श्री.............................. उकृअ ...........**

**लाभार्थ्याचे नाव व स्वाक्षरी**

# परिशिष्ट - ६

## पर्यवेक्षीय तपासणी अहवाल

## नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प — शेततळे अस्तरीकरण

| | | | |
|---|---|---|---|
| १. | तपासणी दिनांक | | |
| २. | तपासणी अधिकारी | श्री/श्रीमती ______________________________ | |
| ३. | पदनाम | | |
| ४. | तपासणी वेळी उपस्थित इतर अधिकारी/ कर्मचारी | १. श्री/श्रीमती. ____________________________<br>पदनाम ____________________________<br>२. श्री/श्रीमती ____________________________<br>पदनाम ____________________________ | |
| ५. | लाभार्थ्याचे नाव | सर्वे नं./गट न. ________<br>वर्गवारी: __________ (अ.जा./अ.ज./सर्वसाधारण/इतर)<br>मु.पो. _______________ ता. _______________ उपविभाग __________ जि. ___________________ | |
| ६. | बाब | शेततळे अस्तरीकरण | |
| ७. | प्रकल्पाचे ठिकाण | | |
| ८. | कामाचा कालावधी | | |
| ९. | शेततळे अस्तरीकरण क्षेत्र | | |
| १०. | प्रकल्पाचा मोका तपासणी तपशील | १. शेततळे क्षेत्राचा सर्व्हे नंबर/गट क्र. ......... .........<br>२. शेततळयाचे आकारमान लांबी ...... X रूंदी ...... X खोली ........ (मी.)<br>३. घनफळ (घ.मी.)-<br>४. प्लॅस्टिक अस्तरीकरण एकूण क्षेत्रफळ :- ........................ चौ.मी.<br>५. फिल्म रीइनफोर्सड् एचडीपीई जीओ मेंबरेन ५०० मायक्रॉन दर्जाची आहे काय.Y/N | |
| ११. | लाभार्थ्यास शिफारस करण्यात आलेल्या अर्थसहाय्याची रक्कम रु. | | |
| १२. | तपासणी मध्ये अर्थसहाय्याची परिगणना बरोबर केलेली आहे काय ? | | होय/नाही |
| १३. | नसल्यास तफावत रक्कम रु. | | |
| १४. | मार्गदर्शक सूचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे काय ? | | होय/नाही |
| १५. | लाभार्थ्याचे सर्वसाधारण अभिप्राय | | |
| | | | |
| १६. | गुणवत्तेबाबत तपासणी अधिकाऱ्याचे अभिप्राय | | |
| | | | |

सहाय्यक कृषि अधिकारी यांचे मोका तपासणी, मंजूर आराखडा व मार्गदर्शक सूचनेनुसार काम पूर्ण झाले असून त्याबाबत मी स्वत: खात्री केली आहे. मापनपुस्तिकेतील नोंदी योग्य असून त्या प्रत्यक्ष स्थळावर जाऊन प्रमाणित केलेल्या आहेत. सदर कामाचा दर्जा योग्य आहे.

**तपासणी अधिकारी, श्री.**
**पदनाम.**
**(स्वाक्षरी)**

**इतर अधिकारी श्री.** — **लाभार्थ्याची/ लाभार्थी प्रतिनिधीची स्वाक्षरी**
**पदनाम.** — **(नाव ....................................................)**
**(स्वाक्षरी)**